स्थापना वर्ष : १९६१
स्वतंत्र : १९७०

दूरध्वनी क्र :(०२३८३) २२१३४९, ३०९७४९
(०२३८२) २२१३४९
ई-मेल : dcomm@rediffmail.com

# दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

इथे घडते संपन्न जीवन

## राष्ट्रीय सेवा योजना

दि. १२/१०/२०२१

## National Service Scheme

## शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१

## वार्षिक अहवाल

## "अ" नियमित कार्यक्रम

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने खालील नियमित कार्यक्रम राबिवण्यात आले.**

### १. प्रश्नमंजुषा उपक्रम :-

रासेयो विभागाच्या वतीने कोवीड-१९ महामारीची सामान्य जागरुकता निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातुन दि.२२ एप्रिल २०२० रोजी "प्रश्नमंजुषा" हा उपक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. यामध्ये १३०९ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

### २. जागतिक योग डे :-

जागतिक योग डे निमित्त रासेयो विभागाच्या वतीने २१ जुन २०२० रोजी योग विषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रश्नमंजुषा हा उपक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. यामध्ये १९० स्पर्धंकांनी सहभाग नोंदवला. तसेच योगा डे ऑनलाईन पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ज्यामध्ये स्वयंसेवकांनी आपापल्या घरी राहुन योगा, प्राणायम करुन रासेयो विभागाकडे फोटो पाठविले आहेत.

### ३. दत्तक गावामध्ये "कोव्हिड-१९" च्या प्रादुर्भावाचे सर्वेक्षण :-

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२४ जुन रोजी महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या दर्जी बोरगाव ता. रेणापुर जि. लातूर येथे "कोव्हिड-१९" च्या प्रादुर्भावाचे सर्वेक्षण करण्यात आले. मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड रासेयो विभाग यांच्या परिपत्रकानुसार "कोव्हिड-१९" या साथीच्या रोगाचा ग्रामीण जीवनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्याचा हेतुने दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सदरील उपक्रमाचे आयोजन केले. त्यानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दत्तक घेतलेल्या दर्जी बोरगाव या गावामध्ये सर्व्हे करण्यात आला आहे. ज्यामध्ये "कोव्हिड-१९" च्या संदर्भात जनजागृती कितपत आहे.

"कोव्हिड-१९" प्रादुर्भावाचा लोक कशा पद्धतीने प्रतिकार करत आहेत. तसेच "कोव्हिड-१९" पासुन बचाव करण्यासाठी कोणकोणत्या उपाय योजना करीत आहेत आदि बार्बीना समोर ठेवून सदरील विद्यापीठाने दिलेल्या मुलाखत अनुसूची व गुगल फॉर्मची लिंक भरून सर्व्हे करण्यात आला. सदरील सर्वेक्षण मध्ये दर्जी बोरगाव मधील एकुण ५५ युवक, जेष्ठ व प्रतिष्ठित नागरिकांनी उत्स्फुर्तपणे आपला सहभाग नोंदविला. सदरील उपक्रम प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी ऋृषिकेश भोसीकर, अतिष तिवारी, वैभव ठाकुर, व योगेश देशपांडे आदि स्वयंसेवकाच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला.

**४. ॲन्टी कोरोना फोर्स मध्ये सहभाग :-**

कोविड-१९ विषाणुमुळे होणाऱ्या प्रादुर्भावास किंवा प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी ॲन्टी कोरोना फोर्स म्हणुन आपापल्या गावामध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. लिंबाळा (दाऊ), माळुंब्रा, कलमुगळी, सारोळा आदि गावातील ग्रामपंचायत कार्यालयाकडुन राबविलेल्या सदरील उपक्रमात मोहन बागल, निलेश क्षिरसागर, राजकुमार चामले, शिवम जाधव, सुधीर सुर्यवंशी यांनी ॲन्टी कोरोना फोर्स म्हणुन जुलै, ऑगस्ट २०२० मध्ये सक्रिय कार्य केले आहे.

**५. "माय ट्री माय सेल्फी एक विद्यार्थी एक वृक्ष" उपक्रम :-**

रासेयो विभागाच्या वतीने दिनांक २५ ऑगस्ट २०२० ते ३१ ऑगस्ट २०२० या कालावधीमध्ये माय ट्री माय सेल्फी एक विद्यार्थी एक वृक्ष हा नाविन्यपुर्ण उपक्रम ऑनलाईल पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. आपल्या वसुंध्धरचे साठी व आपल्या पर्यावरण रक्षण संवर्धनासाठी जनजागृगती व्हावी या उद्देशाने सदरील उपक्रम राबवण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या घरी राहुन अंगणात, घराच्या आजुबाजुला आपत्ती नसेल अशा ठिकाणी शेतात, रस्त्याच्या बाजुला विविध प्रकारच्या ६६ वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण केलेलस Geo-Tag फाटो विद्यार्थ्यांनी गुगल फॉर्म भरुन रोसेयो विभागास पाठविला आहे.

**६. रासेयो स्वयंसेवकांची नांव नोंदणी व निवड प्रक्रिया :-**

रासेयो स्वयंसेवकांची नांव नोंदणी व निवड प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सप्टेंबर २०२० या महिन्यात करण्यात आली.

**७. स्पॉईट फ्री इंडिया मोहिमेत सहभाग :-**

सप्टेंबर ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड व संबंध हेल्थ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या स्पॉईट फ्री इंडिया मोहीम मध्ये १००० अधिक स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदवला आहे.

**८. कोविड-१९ ची थपथ संपन्न :-**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.१६ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात केंद्र सरकार पुरस्कृत जनआंदोलन अभियानांतर्गत कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकरय कर्मचारी यांना कोविड-१९ ची शपथ देण्यात आली. सदरील शपथ रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी दिली.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी जनआंदोलन कोविड-१९ या अभियानाचा मुख्य उद्देश स्पष्ट करतांना सांगितले की, मास्क वापरणे, सुरक्षित शारीरिक आंतर व हात स्वच्छ ठेवणे या तीन गोष्टी कायत लक्षात ठेवा असे त्यांनी म्हटले आहे. सदरील कार्यक्रमास प्रामुख्याने प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण, मुल्यशिक्षण विभाग प्रमुख डॉ. मनिषा आष्टेकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव, कार्यालयीन अधिक्षक रूपचंद कुरे, प्रा. दीपक वेदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. लोकांचा सहभाग मिळवणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. त्यात सर्वप्रथम सर्वांनी कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाला रोखण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाच्या सूचनांनुसार गर्दीच्या जागी जाणे टाळणे, मास्क वापरणे, परस्परांमध्ये दोन मिटर आंतर राखणे, साबणाने वारंवार हा स्वच्छ धुणे या सोबत समाजातील प्रत्येक घटकाला यासंबधी जनजागृती करणे अशा प्रकारची शपथ उपस्थितांना देण्यात आली. सदरील कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, व प्रशासकीय कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

College of Commerce LATUR

### ९. <u>"भारतीय संविधान दिन" साजरा :-</u>

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२६ नोंव्हेबर राजी भारतीय संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी सर्वप्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन एन.सी.सी. प्रमुख डॉ. बालाजी कांबळे यांनी केले. त्यांच्या सोबत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन केले. याप्रसंगी डॉ. बालाजी कांबळे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन केले. याप्रसंगी डॉ. बालाजी कांबळे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, उद्देश व महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.

सदरील कार्यक्रमास वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, मुल्य शिक्षण विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, क्रीडा प्रमुख डॉ. नितेष स्वामी, बीसीए, विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, एनसीसी. प्रमुख डॉ. बालाजी कांबळे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव, पर्यवेक्षिका डॉ. अंजली बुरांडे, समन्वयक प्रा. सुभाष मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. साईनाथ उमाटे यांनी मानले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### १०.<u>क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती "महिला शिक्षण दिन" :-</u>

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या भारतातील प्रथमं शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९० वी जयंती महिला शिक्षण दिन म्हणुन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार हे उपस्थित होते. प्रारंभी उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी सावित्रीबीई फुले यांच्या जीवनाचा परिचय करुन देतांना प्रा. अजय चव्हाण म्हणाले की, अंधाराकडुन प्रकाशाकडे नेणारी एक क्रांती ज्योत म्हणजे सावित्रीबाई फुले होत. ज्यांनी स्त्री शिक्षणाचे महत्व समजुन शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे असे सांगितले. सदरील कार्यक्रमा प्रसंगी उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, मुल्य शिक्षण विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉद्य बालाजी कांबळे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. योगेश शर्मा, प्रा. निखिल व्यास, कार्यालयीन अधिक्षक श्री. कातपुरे आदी महाविद्यालयातील प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. साईनाथ उमाटे यांनी केले.

**११. "माझी वसुंधरा" अभियान संपन्न :-**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रीन प्रॅक्टिस सेल यांच्या संखुक्त विद्यामाने दि. ०१/०१/२०२१ रोजी महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत नवीन वर्षात पर्यावरण संवर्धन व रक्षणासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक , प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांना हरित शपथ देण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत जल, वायु, अग्नी, आकाश, पृथ्वीच्या नैसर्गिक स्त्रोताचे संवर्धन व जतन करुन प्रदुषणमुक्त वसुंधरा बनविण्यासाठी हवेची गुणवत्ता, पातही सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाअंतर्गत महाविद्यालयात जाणीव जागृती करण्यासाठी ग्रीन प्रॅक्टिस सेलच्या प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर यांनी उपस्थितांना हरित शपथ दिली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॅा. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, ग्रीन प्रॅक्टिस सेलच्या प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, कार्यालयीन अधिक्षक श्री. कातपुरे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१२.हुतात्मा दिनानिमित्त मौन पाळुन अभिवादन :-**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी ३० जानेवारी रोजी स.११.वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळुन हुतात्मा दिनानिमित्त हुतात्त्यांना अभिवादन करण्यात आले. हुतात्मा दिनाचे औचित्य म्हणजे भारतीय नागरिकांना प्रेरणा देणे,तरुणाईला दिशा दाखविणे आणि हुतात्म्याविषयी आदर व्क्त करणे असा आहे. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी क्रिडा विभाग प्रमुख डॉ. नितेष स्वामी, पर्यवेक्षिका डॉ. अंजली बुरांडे, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. मनीषा आष्टेकरक, डॉ. गणेश लहाने, प्रा. शशिकांत स्वामी, डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. बालाजी कांबळे, प्रा. विठ्ठल जाधव, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १३."राष्ट्रीय मतदार दिवस" मोठ्या उत्साहात साजरा :-

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके हे होते. भारत निवडणुक आयोगाच्या सूचनांनुसार दि.२५ जानेवारी २०२१ हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम श्रीकृष्ण सोळंके, उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, क्रीडा प्रमुख डॉ. नितेश स्वामी, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. लहाने, डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. विठ्ठल जाधव, तसेच महाविद्यालयातील कार्यालयीन अधिक्षक श्री. कातपुरे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी सांगितले की, १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवीन तरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदार प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. तसेच त्यांनी यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली. शेवटी या कार्यक्रमाचे आभार ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रासेयो कार्यक्रमाधिकारी**
(डॉ. साईनाथ उमाटे)
PROGRAMME OFFICER (N.S.S.
Dayanand College of Commerce
LATUR 413 531

**प्राचार्य**
(डॉ. श्रीराम सोळंके)
Principal
Dayanand College of Commerce
LATUR

# INTERNATIONAL YOGA DAY -21/06/2020


# (ONLINE)












College of Commerce
LATUR

# COVID-19 SURVEY AT. ADOPTED VILLAGE DARJI BORGAON -24/06/2020






# PARTICIPATION IN ANTI-CORONA FORCE (VOLINTAIRS) (JULY & AUG 2020)








ॲन्टी कोरोना पथक
ग्रामपंचायत कार्यालय, कलमुगळी
ओळखपत्र
नाव: राजकुमार शिवाजी चामले
मोबाईल: 9404796257
आधार क्रमांक: 7058 4024 8075
पत्ता: मु.पो.कलमुगळी.निलंगा जि.लातूर


ANTI CORONA FORCE
ग्रामपंचायत कार्यालय,
ओळखपत्र
नाव
व्यवसाय शिक्षण
स्वयंसेवक
सरपंच


Anti-Corona-Force
ग्रामपंचायत - लिंबाळा (दाऊ)
नाव - मोहन शेषेराव बागल
पद - स्वंयसेवक
पत्ता - लिंबाळा दाऊ
मो. नं. 9075357633
ग्रामसेवक
सरपंच
स्वंयसेवक


Anti-Corona-Force
ग्रामपंचायत कार्यालय सारोळा
नाव - एस.एम.जाधव
पद - स्वंयसेवक
पत्ता - मु.पो.सारोळा
मो. नं. 9834535143
ग्रामसेवक
सरपंच
स्वंयसेवक


ACF
IDENTITY CARD
ME Suryawanshi Sudhir Angad.
AT. Sarola. Tq. Dl. Latur ACF
MO NO:- 758895961
SIGN

# MY TREE MY SELFY: ONE STUDENT ONE TREE PROGRAM (25-31ST AUG 2020)












# COVID-19 OATH (16TH OCT 2020)






# INDIAN CONSTITUTION DAY (26TH NOV 2020)




# GROUP READING OF INDIAN PREAMBLE

# (26TH NOV 2020)



# KRANTIJYOTI SAVITRIBAI FULE JAYANTI & WOMENS EDUCATION DAY (03RD JAN 2021)



# MAJHI VASUNDHARA ABHIYAN & GREENERY OATH (01ST JAN 2021)





# HUTATMA DIN & SILENT OBSERVANCE CAMPAIGN
# (30TH JAN 2021)



# NATIONAL VOTER'S DAY (25TH JAN 2021)



# NSS - NEWS GALARY 2020-21

पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 8
28 Nov 2020

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा

**लातूर : प्रतिनिधी**

येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी सर्वप्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन एन.सी.सी.प्रमुख डॉ. बालाजी कांबळे यांनी केले. त्यांच्या सोबत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले. याप्रसंगी डॉ. बालाजी कांबळे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, उद्देश व महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, मूल्य शिक्षण विभागप्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, क्रीडाप्रमुख डॉ. नितेश स्वामी, बी. सी. ए. विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, एन. सी. सी. प्रमुख डॉ. बालाजी कांबळे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव, पर्यवेक्षिका डॉ. अंजली बुरांडे, समन्वक प्रा. सुभाष मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. साईनाथ उमाटे यांनी मानले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



लोकमत

न्यूज inbox

## दयानंद महाविद्यालयात माझी वसुंधरा अभियान

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रीन प्रॅक्टिस सेल यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण संवर्धन व रक्षणासाठी हरित शपथ देण्यात आली. यावेळी डॉ. मनीषा आष्टेकर, प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार उपस्थित होते.

Hello Latur
Page No. 2 Jan 03, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# दयानंद महाविद्यालयामध्ये कोविड जनजागृती उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शुक्रवारी जनजागृती अभियानांतर्गत कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सामूहिक शपथ देण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. श्रीराम सोळुंके, डॉ. अशोक शेलगेनवार, डॉ. राजाराम पवार, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. मनीषा आष्टेकर, डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. विठ्ठल जाधव, रुपचंद कुरे, प्रा. दीपक वेदे यांची उपस्थिती होती.

मास्क वापरणे, फिजिकल डिस्टन्स, हात धुणे, कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आदी बाबींवर माहिती देण्यात आली. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

Hello Latur
Page No. 2 Oct 17, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

## आय विटनेस दयानंद वाणिज्यमध्ये अभिवादन...



दयानंद वाणिज्य महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, डॉ. मनीषा अष्टेकर, डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. बालाजी कांबळे, प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. योगेश शर्मा.

Hello Latur
Page No. 2 Jan 05, 2021
Powered by: erelego.com

# दयानंद महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महिला शिक्षण दिन म्हणून साजरी

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ▪ येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या भारतातील प्रथम शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९० वी जयंती महिला शिक्षण दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार हे उपस्थित होते. प्रारंभी उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाचा परिचय करून देतांना प्रा. अजय चव्हाण म्हणाले की, अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी एक क्रांती ज्योत म्हणजे सावित्रीबाई फुले होत. ज्यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व समजून शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे असे सांगितले. सदरील कार्यक्रमा प्रसंगी उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, मूल्य शिक्षण विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. बालाजी कांबळे, ग्रंथपाल प्रा.विठ्ठल जाधव, प्रा.योगेश शर्मा, प्रा.निखिल व्यास आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ePaper देशोन्नती
Tue, 05 January 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/57519228

जानवारी, वापर न करण, आपल घर, परिसरात उपस्थित होते.

# दयानंद महाविद्यालयात 'माझी वसुंधरा' अभियान संपन्न

दैनिक आनंद नगरी



लातूर (प्रतिनिधी)- येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रीन प्रॅक्टिस सेल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ जानेवारी रोजी महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा' अभियाना अंतर्गत नवीन वर्षात पर्यावरण संवर्धन व रक्षणासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांना हरित शपथ देण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'माझी वसुंधरा' अभियाना अंतर्गत जल, वायु, अग्नी, आकाश, पृथ्वीच्या नैसर्गिक स्रोताचे संवर्धन व जतन करून प्रदूषणमुक्त वसुंधरा बनविण्यासाठी हवेची गुणवत्ता, पातळी सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाअंतर्गत महाविद्यालयात जाणीव जागृती करण्यासाठी ग्रीन प्रॅक्टिस सेलच्या प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर यांनी उपस्थितांना हरित शपथ दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, ग्रीन प्रॅक्टिस सेलच्या प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, कार्यालयीन अधीक्षक कातपुरे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

# दयानंद महाविद्यालयात मतदार दिवस साजरा

लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके हे होते. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, क्रीडाप्रमुख डॉ. नितेश स्वामी, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. गणेश लहाने, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे प्रा.विठ्ठल जाधव, कार्यालयीन अधीक्षक कातपुरे आदींसह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

Hello Latur
Page No. 3 Jan 28, 2021
Powered by: erelego.com

Dayanand College of Commerce LATUR

# दयानंद महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महिला शिक्षण दिन म्हणून साजरी

देशोन्नती वृत्तसंकलन...

लातूर ■ येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या भारतातील प्रथम शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९०वी जयंती महिला शिक्षण दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार हे उपस्थित होते. प्रारंभी उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाचा परिचय करून देतांना प्रा. अजय चव्हाण म्हणाले की, अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी एक क्रांती ज्योत म्हणजे सावित्रीबाई फुले होत. ज्यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व समजून शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे असे सांगितले. सदरील कार्यक्रमा प्रसंगी उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, मूल्य शिक्षण विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. बालाजी कांबळे, ग्रंथपाल प्रा.विठ्ठल जाधव, प्रा.योगेश शर्मा, प्रा.निखिल व्यास आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ePaper देशोन्नती
Tue, 05 January 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/5751922

लोकमत

# दर्जी बोरगाव येथे सर्वेक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथे कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सर्वेक्षण करण्यात आले.

मानव संसाधन विकास मंत्रालय, स्वारातीम विद्यापीठाच्या आदेशानुसार ग्रामीण जीवनावर कोरोनाचा झालेला परिणाम यावर सर्वेक्षण केले जात आहे. या अंतर्गत कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाय-योजनेसंदर्भात मार्गदर्शन केले जात आहे. या सर्वेक्षणात ५५ युवकांनी सहभाग नोंदविला.

प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, ऋषिकेश भोसीकर, अतिश तिवारी, वैभव ठाकूर, योगेश देशपांडे आदींसह महाविद्यालयातील रासेयोच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

Hello Latur
Page No. 2 Jun 26, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

## दयानंद महाविद्यालयात मतदार दिवस साजरा

लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके हे होते. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. राजाराम पवार, क्रीडाप्रमुख डॉ. नितेश स्वामी, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. गणेश लहाने, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे प्रा.विठ्ठल जाधव, कार्यालयीन अधीक्षक कातपुरे आदींसह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

Hello Latur
Page No. 3 Jan 28, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# दयानंद वाणिज्यमध्ये संविधान दिन साजरा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : दयानंद वाणिज्य महाविद्यालयात २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन एन. सी. सी. विभाग प्रमुख डॉ. बालाजी कांबळे यांनी केले. त्यांच्यासोबत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी डॉ. राजाराम पवार, डॉ. मनीषा आष्टेकर, डॉ. नितेश स्वामी, प्रा. शशिकांत स्वामी, डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. बालाजी कांबळे, प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. अंजली बुरांडे, प्रा.सुभाष मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक व आभार डॉ. साईनाथ उमाटे यांनी मानले.

Hello Latur
Page No. 2 Nov 28, 2020
Powered by: erelego.com

S

लोकमत




**जनजागृती...** दयानंद वाणिज्य महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथे सर्वेक्षण, कोरोना जनजागृती करण्यात आली.

Hello Latur
Page No. 2 Jun 26, 2020
Powered by: erelego.com

Director (IQAC)
Dayanand College of Commerce,
Latur Latur.(M.S.)

I/C. Principal
Dayanand College of Commerce
LATUR

Dayanand College of Commerce LATUR